**ठळक बातम्या**

- ऑक्टोबर महिन्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना जानेवारीपासून देण्याचं राज्य सरकारचं आश्वासन

- विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात त्वरित विरोधी पक्षनेते नेमण्याची विरोधी पक्षांची अध्यक्ष आणि सभापतींकडे मागणी

- तपोवनातलं एकही झाड न तोडण्याचे हरित लवादाचे नाशिक महापालिकेला आदेश

- चांदीच्या किंमती किलोमागे २ लाख रुपयांच्या पलीकडे

**आणि**

- माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील-चाकूरकर यांच्या निधनाबद्दल देशभरातून शोक व्यक्त

**<><><><><>**

राज्यात ऑक्टोबर महिन्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई जानेवारी २०२६ पासून दिली जाईल, असं मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी आज विधानसभेत सांगितलं. भास्कर जाधव, सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत लक्षवेधी मांडली. एनडीआरएफच्या निकषानुसार मिळणाऱ्या मदतीशिवाय रब्बी हंगामासाठी प्रति हेक्टर अतिरिक्त दहा हजार रुपये मदत दिली जाणार आहे, असं जाधव म्हणाले.

राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात कापूस खरेदी केंद्रावर हेक्टरी कापूस खरेदी मर्यादा वाढवण्यात आली असून आता हेक्टरी २३ क्विंटल उत्पादकता निश्चित करून कापूस खरेदी केली जाणार असल्याचं पणन मंत्री जयकुमार रावल यांनी

आज विधानसभेत सांगितलं. ही उत्पादकता मर्यादा फक्त खरीप हंगाम २०२५ मध्ये उत्पादित कापसासाठीच लागू असेल असं रावल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातल्या शेतरस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र योजना राबवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात यासंबंधीचं निवेदन सादर केलं. मुंबईतील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांना स्वयंपुनर्विकासासाठी प्रोत्साहन देणारा निर्णय घेण्यात आला आहे. भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये सवलतीच्या दराने रूपांतर करण्याच्या योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. मुंबई शहर आणि उपनगरातील शासकीय जमिनींवर ९०, ९९ किंवा ९९९ वर्षांच्या दीर्घ मुदतीचे भाडेपट्टे आहेत, त्यांच्या दरात सुधारणा करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत, असंही बावनकुळे म्हणाले…

**होल्ड.. बाईट - बावनकुळे (१५ सेकंद)**

**<><><><><>**

राज्यातल्या जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची १५ हजार १५८ पदे रिक्त आहेत. शिक्षक उपलब्ध झाल्याशिवाय शाळांतून शिक्षक स्थानांतराला अनुमती दिली जाणार नाही, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे दिली. राज्यातल्या चार प्रमुख कृषी विद्यापीठांमध्ये ७ हजार १९९ शिक्षक आणि शिक्षकेतर पदे रिक्त आहेत, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल विधान परिषदेत लेखी उत्तरात दिली. वित्त विभागाच्या मंजुरीनंतर सरकारी धोरणानुसार रिक्त पदे भरली जातील, असेही भरणे म्हणाले.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनांविरोधात १ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान विशेष मोहीम राबवली जाणार असल्याचं परविहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना विधानसभेत सांगितलं. नागपूरमध्ये २०21 ला झालेल्या स्कूलबसच्या अपघाताबद्दल नितीन राऊत यांनी लक्षवेधी मांडली.

<><><><><>

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षातर्फे गेल्या वर्षभरात राज्यातल्या ३५ हजारांहून अधिक रुग्णांना २९९ कोटी ४३ लाखांहून अधिक वैद्यकीय आर्थिक मदत देण्यात आली आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाला एफसीआरए प्रमाणपत्र मिळाले असून ही परवानगी मिळवणारा महाराष्ट्रातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष हा भारतातील पहिला कक्ष ठरला आहे. यामुळे कक्षाला आता परदेशातून थेट देणग्या स्वीकारता येतील.

<><><><><>

विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातल्या विरोधी पक्षनेत्यांची नेमणूक लवकरात लवकर करण्याचं आश्वासन विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषद सभापती यांनी दिल्याची माहिती माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली. नागपुरात राहुल नार्वेकर आणि राम शिंदे यांची भेट घेतल्यावर वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. हे संवैधानिक पद असून विरोधी पक्षांकडून या पदासाठी भास्कर जाधव आणि सतेज पाटील यांच्या नावाचं पत्र दिलेलं आहे. जनतेच्या हिताचे प्रश्न सोडवण्यासाठी हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी या नियुक्ती व्हाव्या अशी मागणी केल्याचं ठाकरे म्हणाले. मात्र या पदावर विजय वडेट्टीवार आणि अनिल परब यांची नियुक्ती व्हावी अशी सत्ताधारी पक्षाची इच्छा असल्याचा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर हा विरोधी पक्षांचा अधिकार असून या पदावर कोणाची नियुक्ती व्हावी हे

विरोधी पक्ष ठरवेल, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली. वेगळ्या विदर्भाचा प्रस्तावावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली.

**होल्ड- उद्धव ठाकरे बाइट (३४ सेकंद)**

विरोधी पक्षनेतेपद देणे हा राजधर्म आहे. पण सरकारला संविधानानुसार कामकाज करायचे नाही, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. विरोधी पक्षनेतेपदासाठी १० टक्के सदस्यसंख्येचा दाखला दिला जात असेल तर वरच्या सभागृहात १० टक्के सदस्यसंख्या आहे. सरकारला प्रस्तावही दिलेला आहे. मग तेथे विरोधी पक्षनेत्य़ाचा निर्णय का घेतला जात नाही, असा सवाल त्यांनी केला.

**<><><><><>**

पावसाळी अधिवेशनात मुंबईत विधानभवन परिसरात मारामारी केल्याप्रकरणी आमदार जितेंद्र आव्हाड यांचे समर्थक नितीन देशमुख आणि आमदार गोपीचंद्र पडळकर यांचे समर्थक सर्जेराव टकले यांना दोन दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा विधीमंडळाच्या विशेषाधिकार समितीने ठोठावली आहे. दोघांना ३१ डिसेंबर २०२९ पर्यंत विधानभवन परिसरात प्रवेशबंदीही केली आहे. या प्रकरणी विशेषाधिकार समितीचा अहवाल आज विधानसभेत सादर करण्यात आला.

**<><><><><>**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुती म्हणूनच लढणार असल्याचं भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आज नागपुरात पत्रकार परिषदेत म्हणाले. महत्त्वाच्या महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत महायुतीतले सर्व पक्ष एकत्रितरित्या निवडणुकीत उतरतील. यासंदर्भात देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत संयुक्त बैठक झाल्याची माहिती त्यांनी दिली. सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये पक्षस्तरावर समित्या

तयार करुन युतीचा फॉर्म्युला ठरवण्याच्या दृष्टीने बैठकीत चर्चा झाली. लोकहित आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन महानगरपालिका निवडणुकांमधलं जागावाटप ठरवलं जाईल, असं चव्हाण यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

नाशिकमधल्या तपोवनातील एकही वृक्ष तोडू नये असे आदेश पुणे हरित लवादाने नाशिक महानगरपालिकेला दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयातले वकील श्रीराम पिंगळे यानी यासंबंधी पुणे हरित लवादाकडे  याचिका दाखल केली होती, त्यावर लवादाने हा निर्णय दिला आहे. कोणतंही झाड कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय तोडू नये असं लवादाने सांगितलं.

<><><><>

चांदीच्या दरांनी आज किलोमागे २ लाख रुपयांचा टप्पा पार केला. मुंबईच्या बाजारपेठेत कालच्या तुलनेत किलोमागे चांदी सुमारे ७ हजार महाग झाली आणि एक किलोसाठी २ लाख १ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागत होती.

२४ कॅरेट सोनं तोळ्यामागे महाग होऊन तोळ्यामागे १ लाख ३६ हजार रुपयांच्या पलीकडे गेलं. २२ कॅरेट सोनं तोळ्यामागे सुमारे ३ हजार ९०० रुपयांनी महागलं आणि त्यासाठी १ लाख ३३ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागले.

<><><><>

सायबर गुन्ह्यांचा तपास जलद गतीनं होण्यासाठी मायक्रोसॉफ्टनं MahaCrimeOS AI’ ची आज मुंबईत सुरुवात केली. महाराष्ट्र सरकारच्या मार्व्हल या कंपनीच्या सहकार्यानं हा AI प्लॅटफॉर्म तयार केला आहे. सध्या नागपुरातल्या २३ पोलिस ठाण्यात याचा वापर सुरू आहे. लवकरच राज्यातल्या सर्व अकराशे पोलिस ठाण्यात याचा वापर सुरू होईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. मायक्रोसॉफ्टचे अध्यक्ष सत्या नाडेला यावेळी उपस्थित

होते. मायक्रोसॉफ्टने भारतातल्या त्यांच्या १७ अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीत महाराष्ट्राला प्राधान्य देण्याचं आश्वासन दिल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. ब्रुकफील्ड कंपनी मुंबईत सुमारे २० लाख चौरस फूट क्षेत्रावर आशियातलं सर्वात मोठे Global Capability Center उभारणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट (२० सेकंद)**

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील-चाकूरकर यांचं आज पहाटे लातूर इथं निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. पाटील यांनी लोकसभेच्या सभापतीपदासह केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची पदे भूषवली होती. लातूर मतदारसंघातून ते सात वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. पाटील यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता लातूर शहराजवळील वरवंटी इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी लातुरात त्यांच्या पार्थिवाचं दर्शन घेतलं. शिवराज पाटील हे स्वच्छ चारित्र्याचे, अजातशत्रू वृत्तीचे, आणि सर्वपक्षीय संबंध जपणारे संतस्वभावी नेते होते, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. याशिवाय देशभरातल्या आणि राज्यातल्या मान्यवरांनी चाकूरकर यांना आदरांजली अर्पण केली आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत राज्यातलं हवामान मुख्यतः कोरडं राहील. मध्य महाराष्ट्रात आणि विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येईल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><><>//**